पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक ७

दिनांक: १४/१०/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील “राजमाता जिजाऊ सभागृह” येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.सौ.काळभोर वैशाली जालिंदर - सभापती
२. मा .सुभद्रा ठोंबरे
३. मा. भारती फरांदे
४. मा.आर.एस.कुमार
५. मा. जावेद शेख
६. मा. भालेराव प्रतिभा
७. मा. पांढरकर निलेश
८. मा. नंदा विकास ताकवणे
९. मा.नेटके सुमन राजेंद्र
१०. मा. तरस बाळासाहेब
११. मा. झांबरे सतिश (स्विकृत सदस्य)
१२. मा. कुटे गिरीष (स्विकृत सदस्य)
१३. मा. भोंडवे बेबीनंदा (स्विकृत सदस्या )

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर -क्षेत्रीय अधिकारी, श्री. लियाकत पिरजादे,कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे , श्री. संजय भोसले , श्री. बन्सल एच.पी. उपअभियंता स्थापत्य, श्रीम.लता बाबर - उपअभियंता विद्युत, श्रीमती. मोमीन, उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री. प्रदीप पुजारी, उपअभियंता ,झोनिपु- स्थापत्य, श्री. शिंदे एच.एस. उपअभियंता, जलनि:स्सारण, श्री.पांडुरंग जाधव, लेखाधिकारी, श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री. शितोळे एस.के. कनिष्ठ अभियंता, झोनिपु स्थापत्य, श्री. ज्ञानोबा कांबळे, उद्यान सहाय्यक, उदयान विभाग उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १ मा. बाळासाहेब तरस यांचा दि. १४/१०/२०१५ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १८ किवळे विकासनगर येथील जागा कलम २०५ अंतर्गत
रस्त्यासाठी ताब्यात घेणेबाबत..

अ) दिनांक १०/९/२०१५ ठराव क्रमांक २८ (कार्यपत्रिका ६) मोरवाडी प्रभाग क्रमांक २७ येथे सुप्रिम हॉटेल जवळील रस्त्यास कै. नारायण दगडू कापसे पथ तसेच कांता रेसिडेन्सी येथील रस्त्यास कै. नामदेव हरि लुकर पथ असे नामकरण करणेस व शामदिन इंडस्ट्री जवळील चौकास रामचंद्र गायकवाड उर्फ गायकवाड मिस्त्री पथ असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

आ) दिनांक १०/०९/२०१५ रोजी घेणेत आलेल्या माहे सप्टेंबर २०१५ चे (तहकूब सभा दि. ९/९/२०१५) मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ६) दुरुस्तीसह कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**ठराव क्रमांक : ३१** **विषय क्रमांक : १**

दिनांक : १४/१०/२०१५ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. सुमन राजेंद्र नेटके अनुमोदक : मा.बाळासहेब जयवंत तरस

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास “हस्तीमल शेठ गादिया मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक १४/१०/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

**ठराव क्रमांक : ३२** **विषय क्रमांक : २**

दिनांक : १४/१०/२०१५ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. संगिताताई भोंडवे अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ किवळे (मुकाई चौक) मधील बस टर्मिनलचे “ मुकाई बस टर्मिनल ” असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

(दिनांक १४/१०/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**ठराव क्रमांक : ३३** **विषय क्रमांक : ३**

दिनांक : १४/१०/२०१५ विभाग : आरोग्य

सूचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा. जावेद शेख

**संदर्भ** : अ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील पत्र दिनांक २३/९/२०१५

अ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील पत्र क्र. अक्षेका/आ/२/कावि/७०९/२०१५ दिनांक २३/९/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कचरा कुंडयामधील कचरा, रस्त्याच्या कडेस व सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा उचलणे व त्याची वाहतुक भोसरी स्थानांतरण केंद्र येथे खाली करणे अथवा मोशी कचरा डेपो येथे टाकून पसरविणेचे कामाची बीले " कचरा उचलणे व हलविणे " या लेखाशीर्षावरुन खर्ची टाकण्यात येतात. सदर लेखाशीर्षावर सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. ५०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली असून त्यापैकी र.रु. ३१,११,३१९/- इतका खर्च झाला असून र.रु. १८,८८,६८१/- इतकी तरतूद दिनांक १०/९/२०१५ अखेर शिल्लक आहे. त्यामुळे " कचरा उचलणे व हलविणे " या लेखाशिर्षावर तरतूद अपुरी पडणार आहे.

तरी अ क्षेत्रीय आरोग्य विभागाकडील " ठेकेदारी पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे " या लेखाशिर्षामधून ररु. १५,००,०००/- व " हॉटेल वेस्ट वाहतूक खर्च "या लेखाशिर्षामधून र.रु. १०,००,०००/- अशी दोन्ही मिळून एकूण र.रु. २५,००,०००/- इतकी तरतूद " कचरा उचलणे व हलविणे " या लेखाशिर्षावर वर्ग करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०३ व अनुसूची प्रकरण ७ (२) मधील तरतुदीनुसार मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

**ठराव क्रमांक : ३४** **विषय क्रमांक : ४**

दिनांक : १४/१०/२०१५ विभाग : आरोग्य

सूचक : मा. जावेद शेख अनुमोदक :मा.बाळासाहेब तरस

संदर्भ : . मा. जावेद शेख यांचा दिनांक २२/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

सफाई कर्मचारी कामाची वेळ सांभाळीत नाही. कामाच्या वेळेत नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित नसतात. तर आपल्या वैयक्तिक खाजगी कामांना प्राधान्य् देवून कामाचे वेळेत मुकादम/आरोग्य निरीक्षक यांना पूर्व कल्पना न देता बाहेर जातात. त्यामुळे सफाई कामावर परिणाम होतो. तरी सर्व सफाई कर्मचारी , हंगामी ठेकेदार व कायम यांचेसाठी बायोमेट्रिक हजेरी पध्दत सुरु करण्यात यावी. तसेच कोणी

कर्मचारी कामाचे वेळेत काम सोडून खाजगी/वैयक्तीक कामासाठी बाहेर गेल्यास त्या कर्मचा-याची संपूर्ण दिवसाची गैरहजेरी लावण्याचा अधिकार मुकादम/ आरोग्य निरीक्षक यांना देणेबाबत विचार करणे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ३५ | विषय क्रमांक : ५ |
| दिनांक : १४/१०/२०१५ | विभाग : स्थापत्य |
| सूचक : मा.बाळासाहेब तरस | अनुमोदक : मा. सुमनताई नेटके |

संदर्भ : मा. बाळासाहेब तरस यांचा दिनांक १४/१०/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. १८ किवळे विकासनगर-दांगटवस्ती येथील स.नं. ४२ मधील सुमारे ३५ कुटुंबांना जा-ये करणेसाठी रस्ता नसलेने गैरसोय होत आहे. सदर ठिकाणी रस्ता करुन मिळणेबाबत तेथील नागरिक मागणी करीत आहेत तसेच आंदोलनही करीत आहेत.

तरी सदर ठिकाणी पोहच रस्ता करणेसाठी तेथील जागामालक श्री. प्रकाश दांगट व इतर यांची जागा महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०५ अन्वये ताब्यात घेऊन रस्ता करणेत यावा असा ठराव मा. प्रभाग समितीमध्ये मंजूर करावा.

ठराव कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाहीसाठी नगररचना विभागाकडे पाठविणेबाबत विचार करणे

.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.वैशाली जालिंदर काळभोर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/३०७/२०१५
दिनांक : ०२/११/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती